श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती ,पंढरपूर
सुधारित आकृतीबंधास मंजूरी देणेबाबत ...

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग ,
शासन निर्णय क्र.-पीटीए १३१८/१२१८/प्र.क्र.१२६/का.१६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
**दिनांक : ३ जानेवारी २०१९.**

वाचा :- १. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,पंढरपूर येथील समितीच्या दि.३.०७.२०१८च्या बैठकीतील ठराव क्रमांक५(क).

२. कार्यकारी अधिकारी,श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा दि.१५.०७.२०१८ रोजीचा सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव.

३. विधि व न्याय विभाग शासन निर्णय क्र.पीटीए२०१४/५३३/प्रक्र७०/कार्या.१६, दिनांक २९/११/२०१६

प्रस्तावना :-

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्याकडे पंढरपूरातील मुख्य मंदिर आणि मंदिर परिसरातील ३६ परिवार देवता, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता यांचे व्यवस्थापन करण्याचे कामकाज आहे. या सर्व देवदेवतांची पूजा-अर्चा इ. दररोजचे नित्योपचार, नैमित्तिक उपचार, मंदिरात व मंदिराबाहेरील परिवार देवतांच्या मंदिरात साजरे करण्यात येणारे यात्रा व उत्सव, दरवर्षी येणाऱ्या आषाढी,कार्तिकी,माघी व चैत्री या ४ मोठ्या यात्रा तसेच भाविकांना भक्त निवास उपलब्ध करुन देणे, अन्नछत्राची सुविधा उपलब्ध करुन देणे, प्रसाद स्वरुपामध्ये बुंदी व राजगिरा लाडू उपलब्ध करुन देणे, दर्शनरांगाची चांगल्या पध्दतीने व्यवस्था करणे इ. सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात. मंदिर समितीद्वारे गोशाळा चालविली जाते. त्यांची देखभाल करण्यासाठी कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतात. मंदिर समितीच्या संपूर्ण महाराष्ट्रभर सुमारे ७०० हेक्टर देवस्थान जमिनी आणि भाविकांमार्फत दान दिलेल्या जमिनी आहेत. या जमिनीचे व्यवस्थापन मंदिर समितीला करावे लागते. मंदिर समितीची सर्व कामे महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील लाखो भाविकांच्या भावनेशी संबंधित आहेत. त्यामुळे सर्व कामे अत्यंत काटेकोरपणे वेळच्यावेळी हजारो वर्षाचे प्रथा व परंपरांची सांगड घालून करणे आवश्यक असते. कामातील त्रुटींमुळे भाविकांच्या श्रध्देला तडा जाणार नाही, यासाठी पुर्णपणे दक्षता घेणे आवश्यक असते.

२. संदर्भांकित शासन निर्णय क्रमांक (३) अन्वये दि.२९.११.२०१६ अन्वये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरच्या आस्थापनेवरील २२७ पदांचा आकृतीबंध अटी व शर्तीच्या अधीन मंजुर केला होता.

३. सदरचा आकृतीबंध हा अस्थायी समितीने केला होता. या प्रस्तावित आकृतीबंधावर कर्मचाऱ्यांच्या हरकती घेण्यात आल्या नव्हत्या. त्यानुषंगाने काही कर्मचाऱ्यांनी मंदिर समितीकडे तक्रार नोंदवली होती. शासनाच्या दि.०३.०७.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थायी समिती गठीत करण्यात आली आहे. समितीच्या दि.२२.११.२०१७ च्या सभेतील ठराव क्र.१४ (४) अन्वये सदर आकृतीबंध नोटीस बोर्डावर प्रसिध्द

करुन कर्मचाऱ्यांच्या हरकती मागविण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शासनास प्रस्तावित केलेला आकृतीबंध कर्मचाऱ्यांच्या हरकतीसाठी प्रसिध्द करण्यात आला.

४. ५ पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ नुसार मंदिर समितीचे कामकाज १९८५ पासून सुरु झाल्यापासून मंदिर समितीने गरजेनुसार या सर्व कामांसाठी वेळोवेळी कर्मचारी नियुक्त केलेले आहेत. या कर्मचाऱ्यांच्या सुमारे १५ ते २५ वर्षाच्या सेवा समितीकडे झालेल्या आहेत. सध्या मंदिर समितीकडे कायम, हंगामी व मानधन तत्त्वावर कर्मचारी कार्यरत आहेत. सदर कर्मचा-यांची मंदिर समितीकडे किमान ३.५ वर्षे ते जास्तीतजास्त ३० वर्षाची सेवा झालेली आहे.

५. ५ श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीमार्फत पंढरपूर येथील मुख्य मंदिर आणि मंदिरातील परिवार देवता तसेच पंढरपूर शहर व परिसरातील परिवार देवतांचे व्यवस्थापन केले जाते. या सर्व देवदेवतांची दैनिक पुजा- अर्चाचे व्यवस्थापन जबाबदारी तसेच परिच्छेद क्रमांक (१) मध्ये नमूद समितीमार्फत करण्यात येत असलेल्या कामकाजाचा आवाका पहाता तसेच प्राचीन काळापासून पारंपारिक पध्दतीने पार पाडण्यात येणाऱ्या प्रथांची जपणूक करुन समितीला सर्व जबाबदाऱ्या योग्यरितीने पार पाडता याव्यात यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,पंढरपूर यांच्या संदर्भांकित क्रमांक (१) येथे नमूद दि.३.०७.२०१८च्याबैठकीतील ठराव क्रमांक ५ (क) अन्वये मान्यता मिळाल्यानुसार कार्यकारी अधिकारी,श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी त्यांच्या दि.१५.०७.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या सुधारित आकृतीबंधाच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्यामार्फत पंढरपूरातील मुख्य मंदिर आणि मंदिर परिसरातील ३६ परिवार देवता, तसेच पंढरपूर शहर व परिसरातील २८ परिवार देवता **यांचे** व्यवस्थापन करण्यात येते. तसेच या सर्व देवदेवतांची पूजा-अर्चा इ. दररोजचे नित्योपचार, नैमित्तिक उपचार, मंदिरात व मंदिराबाहेरील परिवार देवतांच्या मंदिरात साजरे करण्यात येणारे यात्रा व उत्सव, दरवर्षी येणाऱ्या आषाढी,कार्तिकी,माघी व चैत्री या ४ मोठ्या यात्रा तसेच भाविकांना भक्त निवास/अन्नछत्र/प्रसादाची सुविधा उपलब्ध करुन देण्यासह दर्शनरांगांचे, गोशाळा व देवस्थान जमीनींचे व्यवस्थापन करण्याचे कामकाजही करण्यात येते.

पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतूदीन्वये श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीकडे सोपविण्यात आलेल्या उपरोक्त नमूद जबाबदाऱ्या व कर्तव्ये समितीला पार पाडता याव्यात यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या आस्थापनेवर आवश्यक असणाऱ्या विविध संवर्गातील **एकूण २७० पदांच्या (स्थायी २६८ पदे + अस्थायी मानधन तत्वावर २ पदे )** पुढील सुधारित आकृतीबंधास खाली नमूद केलेल्या अटीं व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अधिकारी | ०१ | शासनाकडून प्रतिनियुक्तीवर |
| २ | व्यवस्थापक | ०१ | शासनाकडून प्रतिनियुक्तीवर |
| ३ | लेखा अधिकारी | ०१ | शासनाकडून प्रतिनियुक्तीवर |
| ४ | मालमत्ता अधिकारी | ०१ | **मानधनाप्रमाणे (अस्थायी )** |
| ५ | विभाग प्रमुख | १० | ५२००-२०२००+ग्रे.पे.२४०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | पुजारी | १० | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| ७ | रोखपाल | ०१ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| ८ | संगणक तज्ञ | ०१ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| ९ | स्थापत्य अभियंता | ०२ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| १० | सीसीटीव्ही ऑपरेटर | ०३ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| ११ | लिपीक | ४० | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| १२ | सुरक्षा कर्मचारी | २३ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| १३ | वाहन चालक | ०४ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| १४ | पशुवैद्यकीय अधिकारी | ०१ | ५२००-२०२००+ग्रे.पे.१९०० |
| १५ | इतर सेवक | ७४ | ४४४०-७४४०+ग्रे.पे.१३०० |
| १६ | परिवार देवता पुजारी | १४ | ४४४०-७४४०+ग्रे.पे.१३०० |
| १७ | परिवार देवता सेवक | ३३ | ४४४०-७४४०+ग्रे.पे.१३०० |
| १८ | सफाई कर्मचारी | ४३ | ४४४०-७४४०+ग्रे.पे.१३०० |
| १९ | सुतार नि शिपाई | ०१ | ४४४०-७४४०+ग्रे.पे.१३०० |
| २० | तारतंत्री | ०५ | ४४४०-७४४०+ग्रे.पे.१३०० |
| २१ | सराफ | ०१ | **मानधनाप्रमाणे (अस्थायी)** |
| | | २७० (स्थायी २६८ + मानधनतत्वावर २) | |

<u>अटी व शर्ती :-</u>

१. सदर आकृतीबंधाद्वारे नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करुन प्रत्येक पदाची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये समितीने निश्चित करावीत. पद भरती करताना सेवा प्रवेश नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२. सदर आकृतीबंधाद्वारे समितीच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येणारी पदे भविष्यात सेवानिवृत्तीमुळे रिक्त झाल्यानंतर अशा पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने प्रत्येक पदाची शैक्षणिक पात्रता व अर्हता याबाबत जाहिरात प्रसिध्द करुन रिक्त पदे स्पर्धात्मक परिक्षा घेऊन भरावीत. अशा पदांवर नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध असणार नाहीत.

३. शासनाने निश्चित केलेल्या आकृतीबंधाबाहेर जाऊन समितीला पदभरती करता येणार नाही व तसेच कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनमान्यतेखेरीज समितीला बदलता येणार नाही

४. समितीच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येणाऱ्या सदर पदांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे निवृत्ती वेतन योजना लागू असणार नाही तसेच समितीच्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती, कुंठीत वेतनवाढी अनुज्ञेय असणार नाही.

५. आकृतीबंधाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या स्थायी पदांवर नविन कर्मचाऱ्याची नियुक्ती करताना अशा कर्मचाऱ्याला एक वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीवर नियुक्त करण्यात यावे आणि त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरुवातीच्या टप्प्यावर निश्चित करण्यात यावे. संबंधित कर्मचाऱ्याच्या कामाचे मूल्यमापन केल्यानंतर त्या कर्मचाऱ्यास श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या व्यवस्थापन समितीने पुढील सेवेस पात्र

ठरविल्यास परिविक्षाधीन कालावधी समाप्त करुन मूळ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

६. सदर आकृतीबंधाद्वारे निर्माण करण्यात येणाऱ्या पदांवर नियुक्ती करताना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध होणार नाहीत, ही बाब उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी मात्र श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या व्यवस्थापन समितीची खात्री झाल्यास सेवाप्रवेश नियमानुसार एखाद्या कर्मचाऱ्याला त्याची अर्हता व योग्यता तपासून शासनमान्यतेने वरिष्ठ पदावर नवीन नियुक्ती देता येईल.

७. सदर आकृतीबंधाद्वारे निर्माण करण्यात येणाऱ्या पदांना श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथील व्यवस्थापन समितीने शासनाच्या मान्यतेने तयार केलेले सर्व नियम लागू राहतील.

८. देवस्थानाच्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्क्यांच्या मर्यादेत प्रशासकीय बाबीवरील खर्च मर्यादित राहिल, या अटींच्या अधीन राहून पंढरपूर मंदिरे समितीच्या कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात वाढ करता येईल.

९. त्यांना सदर वेतनश्रेणी आकृतीबंध मंजुर केल्याच्या दिनांकापासून लागू होईल.

१०. आकृतीबंधाप्रमाणे मंजुर केलेल्या वेतनश्रेणीमध्ये आधीपासून कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होत नसल्यामुळे, सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये किमान रु.२ हजार ते रु.५ हजार वाढ होईल याप्रमाणे त्यांना किमान रु.५००/- ते किमान रु.३०००/- विशेष भत्ता मंजुर येईल.

११. कर्मचाऱ्यांचे सेवाविनियम व सेवाप्रवेश नियम अंतिम झाल्यावरच पदाची किमान शैक्षणिक पात्रता पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्याला त्या पदावर नियुक्ती करता येईल.

१२. भविष्यात या आकृतीबंधावरील कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यामुळे अशा पदावर नव्याने नियुक्ती करताना समितीने प्रत्येक पदाची शैक्षणिक आर्हता व पात्रता याबाबत जाहिरात प्रसिध्द करुन रिक्त पदे स्पर्धात्मक परिक्षा घेऊनच भरणे आवश्यक राहिल.

१३. आकृतीबंधानुसार निर्माण पदांना देय वेतन, भत्ते व ईतर सर्व बाबींच्या खर्चाची जबाबदारी व्यवस्थापन समितीची राहील आणि याबाबतीत शासनावर कोणतेही आर्थिक दायित्व येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

सुपसाळुंके

(सु. प. साळुंके)

**कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग.**

प्रत :-

१. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२. मा.राज्यमंत्री, विधि व न्याय, यांचे खाजगी सचिव,
३. प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
४. मा. अध्यक्ष, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
५. कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
६. निवड नस्ती/का.१६.